गडचिरोली या नक्षलग्रस्त जिल्हयातील नक्षलवाद्यांनी हत्या केलेल्या गोपनीय बातमीदारांच्या कुटूंबातील एका व्यक्तीस शासन सेवेत सामावून घेण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग,
शासन निर्णय क्रमांक-: एनएएक्स०११६/प्र.क्र.४/विशा-१ ब,
हुतात्मा राजगुरु चौक ,मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: ०६ मार्च, २०१८

प्रस्तावना -:

नक्षलवाद्यांचा मागील ३५-३६ वर्षापासून शासनाविरुध्द सशस्त्र व हिंसक लढाविरुध्द सुरु आहे. पोलीसांना सक्षमपणे नक्षलवाद्यांच्या विरोधातील तीव्र स्वरुपाची कारवाई करण्यासाठी त्यांना ट्रेनिंग, शस्त्र व आयुधे यासह अचूक व निश्चित स्वरुपाची माहिती (Pinpoint Information) मिळणे अत्यावश्यक असते. ही माहिती गोपनीय बातमीदारांकडून प्राप्त होत असते. अशी माहिती प्राप्त होण्यासाठी गोपनीय बातमीदारांचे व्यापक जाळे असणे आवश्यक आहे. अशा गोपनीय बातमीदारांच्या जीवितास सतत धोका असतो. परंतु असा धोका पत्करुन गोपनीय बातमीदार पोलीस दलाची आवश्यक ती मदत करीत असतात. पोलीसांच्या दप्तरी उपलब्ध असलेल्या माहीतीच्या अनुसार पोलीस खबरी असल्याच्या संशयावरुन गडचिरोली जिल्हयात अनेक पोलीस बातमीदारांची नक्षलवाद्यांकडून अत्यंत क्रुरपणे हत्या केल्या जात असल्यामुळे खब-यांचे प्रशस्त व व्यापक जाळे निर्माण करण्यास पोलीस दलाला अडचणी येत आहेत. हयात असलेल्या आणि नक्षल हल्ल्यात मृत्यू पावलेल्या पोलीस खब-यांच्या कुटूंबियांच्या मागे शासन खंबीरपणे उभे आहे असा संदेश सर्वसामान्यांपर्यत पोहचणे आवश्यक आहे. अशा गोपनीय बातमीदारांच्या कुटूंबियांना शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत सातत्याने मागणी व पाठपुरावा करण्यात येत होता.

नक्षलग्रस्त राज्यांनी वाढत्या नक्षली कारवायांना प्रतिबंध घालण्यासाठी आतापर्यंत केलेल्या रणनीती व कृतींचा आढावा घेवून त्यानुसार एकसूत्री कृती योजना (Unifiled Command Mechanism) संरचनेनुसार राज्यस्तरावर एकीकरण व समन्वय समिती (Committee for Integration and Coordination at State Government level) मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आली आहे. सदर समितीच्या दि.०१.०२.२०१८ रोजी झालेल्या बैठकीतील प्राप्त निदेशानुसार गडचिरोली या नक्षलग्रस्त जिल्हयातील नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या गोपनिय बातमीदारांच्या कुटूंबातील एका व्यक्तीस गडचिरोली जिल्हयामध्ये पात्रतेनुसार वर्ग ३ व ४ च्या पदावर शासन सेवेत थेट नियुक्ती देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-:

गडचिरोली या नक्षलग्रस्त जिल्हयातील नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या गोपनिय बातमीदारांच्या कुटूंबातील एका व्यक्तीस एक विशेष बाब म्हणून जिल्हाधिकारी, गडचिरोली यांनी पात्रतेनुसार वर्ग ३ व ४ च्या पदावर खालील अटीच्या अधीन राहून शासन सेवेत थेट नियुक्ती द्यावी. या प्रकरणाचा पुर्वोदाहरण म्हणून भविष्यात दाखला देता येणार नाही.

१. नक्षलवाद्यांकडून मारल्या गेलेल्या गोपनिय बातमीदाराच्या कुटूंबापैकी पात्र असणा-या एका व्यक्तीसाठी पोलीस अधिक्षक हे प्रमाणपत्र देण्यास सक्षम राहतील.
२. संबंधीत उमेदवार हा गडचिरोली जिल्हयातील आधिवासी (Domicile) असणे आवश्यक राहील.
३. उमेदवाराला जिल्हास्तरावर शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्यसंस्था इत्यादीमध्ये ज्या पदावर नियुक्ती द्यावयाची आहे. त्या पदासाठी आवश्यक अर्हता व शैक्षणिक पात्रता उमेदवारांनी धारण करणे आवश्यक आहे.
४. जिल्हाधिकारी गडचिरोली उपलब्ध रिक्त जागांवर नियुक्ती मान्य करण्यासाठी सक्षम प्राधिकारी राहतील.
५. जिल्हाधिकारी यांनी संबंधीत उमेदवाराची नियुक्तीसाठी आदेशीत केल्यानंतर संबंधीत कार्यालयातील नियुक्ती प्राधिकारी यांनी आदेश काढावेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३०६१६१०११७७२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Shashikant Daji Shinde

Digitally signed by Shashikant Daji Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e8ff4601c954422b2375c147539b27f9d481d24af7a356e82ab2bee2b62d564a, serialNumber=979ddbb060e4bf1b0cedf8d4e1496dccc5679cd10d8a344810064c2f25f1c916, cn=Shashikant Daji Shinde
Date: 2018.03.06 16:12:40 +05'30'

(श.दा. शिंदे)

कक्ष अधिकारी ,महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई
२) मा. खासदार लोकसभा / राज्यसभा सदस्य, महाराष्ट्र राज्य
३) मा. विरोधीपक्ष नेता विधानसभा / विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई
४) विधानसभा / विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई
५) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई

६) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७) अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग .
८) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
९) अपर पोलीस महासंचालक (विशेष कृती), महाराष्ट्र राज्य, मुंबई
१०) विशेष पोलीस महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, गडचिरोली,
११) जिल्हाधिकारी, गडचिरोली
१२) पोलीस अधिक्षक, गडचिरोली
१३) महालेखापाल (२) महाराष्ट्र राज्य, (ले.अ.) /(ले.प.), नागपूर
१४) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
१५) अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई
१६) जिल्हा कोषागार अधिकारी, गडचिरोली
१७) सर्व कार्यासने/गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
१८) अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग यांचे वरीष्ठ स्वीय सहायक,
१९) प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग यांचे वरीष्ठ स्वीय सहायक,
२०) निवडनस्ती (वि.शा.१ ब).